नियमित दिवाणी दावा क्र.१५९/२०२३
नि.क्र.३२/ क (सोबत)

वादीतर्फे साक्षीदार क्र.१

**उलटतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री. यु.एस. जाधव यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

१. माझे आई, वडील व भाऊ यांनी माझ्या बहिणीच्या हक्कात ८० आर जमीनीचे खरेदीखत करुन दिले आहे. माझे आजोबा भुकंपात मयत झाले. गोदावरी माझी आत्या आहे. माझे आई, वडील व भाऊ हे एकत्र वडीलोपार्जित घरात राहतात. सदर घरामध्ये माझा हक्क आहे. माझ्या बहिणीची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. माझ्या बहिणीने माझ्या वडीलाकडून रु.५,७७,०००/- चे खरेदीखत करुन घेतले याबाबत मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलानी कुटूंबाच्या गरजेपोटी बहिणीच्या हक्कात खरेदीखत करुन दिले. माझा भाऊ योगेश याचे कोर्टात भांडण चालू होते. त्यांचे भांडण मिटले किंवा नाही याबाबत मला माहीत नाही. माझ्या आईवडीलानी सदर प्रकरणात काय जबाब दिला याबाबत मला माहीत नाही. माझे वडील कुटूंबकर्ते आहेत. माझे वडील व चुलते विभक्त झाल्यानंतर कुटूंबाचा किती खर्च आहे व किती उत्पन्न आहे याबाबत मला माहीत नाही. माझ्या वडीलांच्या नावे कुटूंब प्रमुख म्हणून रु.८०,०००/- कर्ज होते. मी लहान असताना माझी आई मयत झाली. माझी आई वारल्यानंतर वडीलानी मी लहान असताना दुसरा विवाह केला. दुसऱ्या आईला दोन मुले व एक मुलगी आहे. बहिणाला विक्री केलेली ८० आर जमीन बहिणीच्या वतीने वडील कसत आहेत. बहिणीचे हक्कात करुन दिलेले खरेदीखत मी वाचलेले नाही, त्यामुळे कोणत्या कारणासाठी खरेदीखत करुन दिले आहे ते मला माहित नाही. जमीन विक्रीचे कारण कुटुंब प्रमुख म्हणुन माझ्या वडीलांना माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा असून आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

Digitally signed by BHOSALE VRINDA DHANANJAY
Date: 2026.01.28 18:07:02 +0530

दि.२८/०१/२०२६

(**श्रीमती. व्ही. डी. भोसले**)
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, निलंगा.